Golden Resrach Thoughts
Vol -2 , ISSUE –IX, March - 2013
ISSN No-2031-5063

Available online at www.aygrt.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# सरदार वल्लभाई पटेल यांची संविधान निर्मितीतील भूमिका

**प्रा. हरिदास शंकर जाधव**
इतिहास व प्रा.भा.इ.सं.आणि पुरातत्त्वशास्त्र विभाग, चां.ता.बोरा महाविद्यालय, शिरुर जि.पुणे.

देशाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या लढयात अग्रणी राहिलेल्या सरदार पटेलांचे संस्थानांच्या विलीनीकरणातील योगदान सर्वज्ञात व सर्वमान्य आहे. एकसंघ व बलवान भारताची निर्मितीसाठी आयुष्यभर झटणा-या पटेलांचे स्वतंत्र भारताच्या संविधान निर्मितीतील योगदानही उल्लेखनीय आहे. भारतीय संविधान सभेतील महत्त्वाच्या सदस्यांपैकी एक असलेल्या सरदार पटेलांची संविधानाच्या निर्मितीतील महत्त्वाची भूमिका राहिली आहे.

**भारतीय संविधान सभेतील स्थानः**

भारताचे संविधान तयार करण्यासाठी भारतीयांची संविधान सभा असावी असा विचार भारतातील साम्यवादी चळवळीचे प्रणेते मानवेंद्रनाथ रॉय यांनी 1934 साली मांडला होता. त्यांनतर पुढील वर्षी म्हणजे 1935 साली भारतीयांची सर्वात मोठी राजकीय संघटना असलेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय सभेने अधिकृतपणे संविधान सभेची मागणी केली. 1942 च्या ब्रिटिश शासनाच्या निर्णयानुसार किंवा जाहीरनाम्यानुसार भारताच्या संविधान निर्मितीसाठी निवार्चित मंडळाची स्थापना करण्याचे मान्य केले होते.[1] कॅबिनेट मिशनच्या तरतुदीनुसार जुलै 1946 साली संविधान सभेसाठी निवडणुका होऊन भारतीय संविधान सभा अस्तीत्वात आली. संविधान सभेच्या प्रस्तावित 489 सदस्यीय रचनेत ब्रिटीशांच्या नियंत्रणाखालील प्रांतातून निवडून आलेल्या 292 व संस्थांनाच्या 93 प्रतिनिधींचा समावेश होता. प्रत्यक्ष निवडणुकीच्या द्वारे निवडून आलेल्या 296 सदस्यांपैकी कॉंग्रेस पक्षाचे 206 व मुस्लीम लीगचे 73 सदस्य होते.[2] संविधान सभेत बहुमत प्राप्त करणा-या कॉंग्रेस पक्षाच्या सदस्यांमध्ये मुबंई प्रांतातून निवडून गेलेले सरदार वल्लभभाई पटेल हे महत्त्वाचे सदस्य होते. संविधानाच्या निर्मितीसाठी संविधान सभेच्या विविध समित्या स्थापन करण्यात आल्या. अशा विविध समित्यांमध्ये अत्यंत महत्वाच्या असलेल्या दोन समित्यांचे सरदार वल्लभाई पटेल अध्यक्ष होते. भारतातील प्रांतांच्या राज्यकारभाराचे प्रारुप ठरवणारी प्रांतिक संविधान समिती (Provincial Constitution Committee) तसेच देशातील नागरिकांच्या मूलभूत हक्कांसंबंधीच्या व अल्पसंख्याकांचे स्थान निष्चित करणा-या 50 सदस्यीय मूलभूत हक्क व अल्पसंख्यांकविषयक सल्लागार समिती (Advisory Committee on Minorities and Fundamental Rights) या समित्यांचे प्रमुख म्हणून संविधानातील संघराज्य व्यवस्थेतील प्रांत व नागरिकांचे मूलभूत हक्क इ.बाबींशी संबंधित तरतुदींचा समावेश करण्यात सरदार पटेलांची भूमिका महत्वाची होती. याशिवाय संविधानाच्या कामकाजाला दिशा देणा-या 19 सदस्यीय सुकाणू समितीचेही ते प्रमुख सदस्य होते.[3] संविधान सभेतील कार्यातून सरदार पटेलांचा देशाची अखंडता व एकात्मता कायम टिकविणे व बलशाली भारताची निर्मिती करणे हाच दृष्टीकोण असल्याचे दिसून येते.

**प्रांतिक संविधान समितीतील भूमिकाः**

भारतीय संविधान सभेने 30 एप्रिल 1947 रोजी सरदार वल्लभभाई पटेलांच्या अध्यक्षतेखाली प्रांतिक संविधानासंबंधीच्या समितीची स्थापना केली. या समितीतील सदस्यांच्या मदतीने तीन महिन्यांच्या चर्चेनंतर सरदार पटेलांनी आपल्या समितीचा अहवाल 15 जुलै 1947 रोजी संविधान सभेला सुपूर्द केला. तर 27 जुलै रोजी संविधान सभेच्या बैठकीत हा अहवाल सादर केला.[4] संविधान सभेने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील राज्यपालाचे स्थान व अधिकार, राज्याचे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळाची अधिकारकक्षा व जबाबदारी, राज्य लोकसेवा आयोगाची रचना व राज्याचा महालेखापाल इ. संबंधीच्या तरतुदींचा यात समावेश होता. पटेलांच्या नेतृत्वाखालील या समितीने भारतातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचे भान ठेऊन ब्रिटीश शासनप्रणालीशी मिळतीजुळती असलेल्या संसदीय शासनप्रणालीचा स्वीकार करताना संघराज्य पध्दतीचा पुरस्कार केला. याशिवाय भारतीय संविधानात असलेल्या महत्वाच्या तरतुदींची शिफारस या समितीने केलेली दिसते. केंद्रसरकारचा प्रतिनिधी असलेल्या राज्यपालास राज्यातील शांतता व सुव्यवस्थेसंबंधीचा अहवाल देण्याचा अधिकार, राज्य विधीमंडळांच्या निवडणुका निःपक्षपातीपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी राज्यातील निवडणुकांवर नियंत्रण ठेवण्याचा व पर्यवेक्षणाचा अधिकार, राष्ट्रपती नियुक्त केंद्रीय निवडणूक आयोगाला सर्वाधिकार देणे तसेच राज्यातील उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नियुक्त्या करण्यात केंद्र शासनाला दिलेला अधिकार ही यासंबंधीची काही उदाहरणे म्हणता येतील. राज्यातील विधीमंडळाचा विचार करता सरदार पटेलांच्या या समितीने प्रत्येक राज्यात एकगृही विधीमंडळाचा पुरस्कार केला होता, मात्र त्याचबरोबर एखाद्या प्रांताची द्विगृही विधीमंडळ स्थापन करण्याची इच्छा असल्यास अशा प्रांताना विशिष्ट प्रक्रियेद्वारे विधानपरिषदेची निर्मिती करण्याचा अधिकार देण्याची शिफारसही समितीने केली होती. न्यायालयीन प्रक्रिया ही संशय आणि पक्षीय प्रभावापासून दूर रहावी या उद्देशानेच या समितीने संघराज्याच्या अध्यक्षाकडून म्हणजेच राष्ट्रपतींकडून उच्च न्यायालयातील न्यायाधिशांच्या नियुक्त्या करण्याची महत्वाची शिफारस केली.[5] सरदार पटेलांच्या या समितीने केलेल्या शिफारशीवरून भारतीय संघराज्य व्यवस्था मजबूत व दृढ पायावर उभी करण्याचा सरदार पटेलांचा दृष्टीकोन स्पष्ट होतो.

**अल्पसंख्यांक व मूलभूत हक्क विषयक सल्लागार समितीः**

सरदार वल्लभभाई पटेल हे संविधानाची अत्यंत महत्वाची व संवेदशील असलेल्या मूलभूत हक्क व अल्पसंख्यांकांच्या अधिकारासंबंधीच्या समितीचे अध्यक्ष होते. एकूण 72 सदस्यांच्या या समितीच्या दोन उपसमित्याही स्थापन करण्यात आल्या होत्या. आचार्य जे.बी.कृपलानी हे मूलभूत हक्कविषयक तर एच.सी.मुखर्जी हे अल्पसंख्यांक विषयक समितीचे प्रमुख होते. 24 जानेवारी 1947 रोजी स्थापन करण्यात आलेल्या या समितीने 8 ऑगस्ट 1947 रोजी आपला अहवाल संविधान सभेला सादर केला. देशातील अल्पसंख्यांक गटांना व्यापक सामाजिक संरक्षण व राजकीय क्षेत्रातील योग्य वाटा देण्याची कामगिरी या समितीने पार पाडली. या समितीने केलेल्या महत्वाच्या शिफारशीमध्ये अल्पसंख्यांकांना जात व धर्माच्या आधारे स्वतंत्र मतदार संघाच्या ऐवजी संयुक्त मतदारसंघाच्या माध्यमातून राखीव जागांची तरतूद, सार्वजनिक किंवा शासकीय सेवांमध्ये राखीव जागा देण्याबरोबरच अल्पसंख्यांकांचे हक्क सुरक्षित राखण्याची हमी देणारी प्रशासकीय यंत्रणा असावी इ. तरतुदींचा समावेश होता.[6] अल्पसंख्यांकांचे अधिकार व देशातील जातीय प्रश्नांकडे पाहण्याच्या सरदार पटेलांच्या दृष्टीकोनावर महात्मा गांधीजींच्या तत्वांचा प्रभाव होता. महात्मा गांधीजींच्या सल्ल्यानुसारच त्यांनी अल्पसंख्याकांच्या अधिकारांच्या बाबतीत कोणतही तडजोड केली नाही. सरदार वल्लभभाई पटेल अल्पसंख्यांकाच्या भाषा, संस्कृती व लिपी यांचे संवर्धन करण्याच्या अधिकाराला घटनात्मक संरक्षण तसेच अल्पसंख्यांकाना त्यांच्या आवडीनुसार शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व चालविण्याचा अधिकार देण्याविषयी आग्रही होते. केवळ त्यांच्या पुढाकारामुळेच या बाबींचा समावेश भारतीय संविधानात झालेला दिसून येतो.[7] सरदार पटेलांच्या नेतृत्वाखालील समितीने तयार केलेला हा अहवाल संविधान सभेने किरकोळ दुरुस्त्या करुन ऑगस्ट 1947 मध्ये स्वीकारला होता. सरदार वल्लभभाई पटेलांनी अल्पसंख्यांकांच्या राजकीय व सामाजिक हक्कांना संरक्षण देणा-या महत्वपूर्ण शिफारशी संविधानात केल्या असल्या तरी त्यांना अल्पसंख्यांकांच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीला तोंड द्यावे लागले. मात्र सरदार पटेलांनी व्यापक राष्ट्रहिताच्या भूमिकेतून अल्पसंख्याकांच्या मागणीला जोरदार विरोध केला होता. यासंदर्भात त्यांनी “मी स्वतंत्र मतदार संघाच्या विरोधात असून तुम्ही मला स्वतंत्र मतदार संघाची तरतूद असणारा एक तरी देश दाखवा जर तसे असेल तर मी या मागणीचा स्वीकार करेन” असे आवाहन स्वतंत्र मतदार संघाच्या समर्थकांना दिले होते.[8] देशातील मुस्लीम, शीख व इतर अल्पसंख्यांकांच्या या मागणीला विरोध करण्यामागील आपली भूमिका त्यांनी 28 ऑगस्ट, 1947 रोजी संविधान सभेतील आपल्या भाषणात स्पष्ट केली होती. ते

म्हणतात की, " देशाच्या विभाजनाला कारणीभूत ठरलेली अशी प्रक्रिया आपण पुन्हा एकदा स्वीकारली तर विभाजनाची पुनरावृत्ती होईल. आपण देशाची निर्मिती करीत आहोत तसेच एका एकात्म राष्ट्राचा पाया घालत आहोत. अशा काळात जे पुन्हा एकदा विभाजनाला थारा देत आहेत, फुटीची बीजे पेरत आहेत अशांना भारतात कोणतेही स्थान नाही. तसेच त्यांना कोणतीही दिशा नाही असेच म्हणावे लागेल."[9] देशाची अखंडता टिकविण्या संदर्भात ते म्हणतात की, " आपल्या देशाची परिस्थिती बदलण्यासाठी तसेच धर्मनिरपेक्ष पायावर देशाची उभारणी करण्यासाठी अल्पसंख्याकांच्या मनात देशातील बहुसंख्यांकांबद्दल सद्भावना, विश्वास, निर्भयता आणि स्वतःबद्दलचा आत्मविश्वास निर्माण करण्याची आवश्यकता आहे. तसेच बहुसंख्यांकानीही अल्पसंख्याकांना काय वाटते आणि त्यांना आजवर जी वागणूक मिळाली तशी आपल्याला मिळाली असती तर काय झाले असते याचाही विचार करावा." [10] एकंदरीत देशाच्या दीर्घ वाटचालीसाठी व सर्वांच्या हितासाठी या देशात बहुसंख्य व अल्पसंख्यांक असे काही होते हे विसरुन एकच समुदाय आहे ही अशा समजूतदार भावनेची आवश्यकता असल्याची सरदार पटेलांची भूमिका होती. म्हणूनच देशाचे अखंडत्व कायम टिकावे या भूमिकेतून त्यांनी संविधान निर्मितीच्या काळात देशातील मुस्लीम शीख या दोन्ही अल्पसंख्यांक समुदायांना स्वतंत्र मतदार संघ व विभाजनवादी तत्वांवर राजकीय व्यवस्थेतील वाटा मागण्यांपेक्षा व्यापक राष्ट्रीय हिताला व एकात्मतेला व अखंडतेला प्राधान्य देण्याचे आवाहन वारंवार केले होते. देशाच्या हितापेक्षा एखाद्या धर्म किंवा समुदायाचे हितसंबंध वेगळे असता कामा नयेत अशी भूमिका घेत त्यांनी "जर देशातील एखाद्या समुदायाचा आपण राहत असलेल्या देशाच्या हितसंबंधापेक्षा आपले हितसंबंध वेगळे आहेत असा दृष्टीकोन असेल तर ती त्यांची महाचूक आहे."[11] असा इशारा दिला होता. देशातील प्रत्येक नागरिकाला सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी तसेच आधुनिक जगात भारताची पुरोगामी राष्ट्र म्हणून ओळख निर्माण व्हावी हा दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन सरदार पटेलांच्या मूलभूत हक्कविषयक समितीने देशातील नागरिकांच्या मूलभूत हक्कांविषयी महत्वपूर्ण शिफारशी केल्याचे दिसून येते.[12] खरे तर सरदार वल्लभभाई पटेलांचा मूलभूत हक्कांविषयीचा विचार कराची कॉंग्रेसच्या अधिवेशनातच स्पष्ट झाला होता. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनात नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा ठराव संमत करण्यात आला होता. हा ठराव सरदार पटेलांच्या या समितीतील कार्याचा आधार होता असे दिसून येते.[13] याशिवाय मूलभूत हक्कांवर गदा आल्यास न्यायालयाकडे दाद मागण्याचा किंवा घटनात्मक उपायोजनांच्या हक्काचाही या समितीने पुरस्कार केला होता. देशातील नागरिकांना धार्मिक व उपासना स्वातंत्र्य देतानाच बळजबरीच्या धर्मातंराला या समितीने विरोध केला होता.[14]

**समन्वयकाची भूमिका:**

संविधान सभेच्या विविध समित्यांतील कार्यासह सरदार पटेलांनी संविधान निर्मितीच्या प्रक्रियेत पडद्यामागे समन्वयकाची महत्वपूर्ण भूमिका पार पाडल्याचे दिसून येते. विषेशतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील संविधानाच्या मसुदा समितीचे काम अधिक जिकरीचे होते. या समितीच्या सदस्यांमध्ये विविध पक्ष व विचारांच्या नेत्यांचा समावेश होता. बहुमत असलेल्या कॉंग्रेस पक्षातही गटबाजी व मतभेद होते. या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस पक्ष संघटनेवर पकड असलेल्या सरदार वल्लभभाई पटेलांनी पक्षातील सदस्यांमध्ये एकोपा व शिस्त निर्माण करण्यात महत्वाची भूमिका बजावली. पटेलांच्या मध्यस्थीमुळे मसुदा समितीला संविधानाच्या प्रत्येक कलमावर व त्यातील दुरुस्तीसंबंधी सविस्तर व साधकबाधक चर्चा घडवून आणून मसुद्याला योग्य दिशा देणे शक्य झाले. त्यांच्या या कामगिरीबद्दल डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी " ज्यावेळी मसुदा समितीतील एखाद्या तरतुदीबाबत मतभेद निर्माण होत आणि अशा वेळी एखाद्या सभासदाची किंवा गटाची समजूत घालण्यात मसुदा समितीला अडचणी येत त्यावेळी या सभासदांची किंवा गटाची मते जाणून घेण्यासाठी व त्यावर चर्चा करण्यासाठी सरदार पटेलांच्या घरी बैठकी होत व तिथे हे मतभेद मिटविले जात." अशा शब्दांत सरदार पटेलांच्या समन्वयवादी भूमिका अधोरेखित केली होती.[15]

एकंदरित सरदार वल्लभभाई पटेलांच्या भारतीय संविधान निर्मितीतील योगदानाचा वेध घेताना त्यांनी देशाची एकात्मता, अखंडता या बाबींना प्राधान्य दिल्याचे दिसून येते. देशातील संघराज्य व्यवस्था, संसदीय शासनप्रणाली बळकट झाली पाहिजे त्याचबरोबर संघराज्यातील राज्यांना त्यांच्या अंतर्गत कारभाराच्या बाबतीतील स्वातंत्र्य व स्वायतत्ता असली पाहिजे या भूमिकेचा त्यांनी पुरस्कार केलेला दिसतो. देशातील सर्वसामान्य नागरिकांना निःपक्षपातीपणे व योग्य न्याय मिळावा यासाठी न्यायालयांचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे. जगातील आधुनिक राष्ट्रांच्या बरोबरीने वाटचाल करण्यासाठी देशातील नागरिकांना आपला विकास साधण्यास अनुरुप मूलभूत हक्कांबाबत आग्रही भूमिका त्यांनी मांडलेली दिसते. सर्वात महत्वाचे म्हणजे सरदार पटेलांची धर्म, वंश, जात इ.कोणत्याही आधारावर देशाचे विभाजन होणार नाही यासंबंधीची व्यापक राष्ट्रीय एकात्मतेची भूमिका संविधान निर्मितीच्या काळात प्रकर्शाने दिसून येते.

**संदर्भ व तळटीपाः**

1. मुन्शी के.एम (संपा.), इंडियन कॉन्स्टिटयूटशनल डाक्युमेंटस्-मुन्शी पेपर्स, व्हॉल्यूम 2 भारतीय विद्याभवन, बॉम्बे, 1967, पृ. 5-6
2. बॅनजी मृत्युंजय, दि कॉन्स्टिटयूटशन ऑफ फ्री इंडिया, दास गुप्ता अॅन्ड कंपनी, कलकत्ता, 1947, पृ. 42-45
3. भारतीय संविधान सभेच्या विविध समित्या व सदस्यांच्या यादीसाठी पहा: मुन्शी के. एम., पुर्वोक्त., पृ. 521-535
4. मेनन व्ही.के, कश्यप अॅन्ड नायर (संपा.), दि फे्रमिंग ऑफ इंडियाज् कॉन्स्टिटयूटशन सिलेक्ट डाक्युमेंटस्, व्हॉल्यूम 2, दि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन न्यु दिल्ली, 1967, कागदपत्रे पृ. 656-57
5. कित्ता., पृ. 665-67
6. कित्ता., पृ. 411-12
7. प्रोसिडिंग्ज ऑफ दि इंडियन हिस्ट्री कॉंग्रेस, व्हाल्युम 63, अमृतसर, 2002 यादव भूपेंद्र यांचा वोज सरदार पटेल कम्युनल? अॅनएक्सरसाईज इन हिस्टोरीकल डायमेस्टीफिकेशन हा लेख, पृ. 784
8. कुमार रविंद्र, लाईफ अॅन्ड वर्क ऑफ सरदार पटेल, पृ. 48
9. कॉन्स्टिटयूट असेम्बली डिबेटस् ऑफिसियल रिपोर्ट, व्हॉल्यूम 4, न्यु दिल्ली, 1947, पृ. 271-72
10. 10. ग्रोव्हर विरेंद्र, (संपा.), वल्लभभाई पटेलः अ बायोग्राफी ऑफ हिज व्हिजन अॅन्ड आयडियाज्, दीप अॅन्ड दीप पब्लिकेशन, न्यु दिल्ली, पृ. 401
11. कुमार रविंद्र, लाईफ अॅन्ड वर्क ऑफ सरदार पटेल, अटलांटिक पब्लिष्चर अॅन्ड डिस्ट्रीब्युटर्स, न्यु दिल्ली, 1991, पृ. 49
12. समितीने मूलभूत हक्काविषयक तपषीलवार निवेदनासाठी पहाः मेनन व्ही.के., व इतर पुर्वोक्त., पृ. 294-296
13. सिदवा आर.के. आणि लालवाणी ताराचंद, रिपोर्ट ऑफ दि फोर्टी फिफ्थ इंडियन नॅशनल कॉंग्रेस हेल्ड अॅट कराची इन मार्च 1931, भारत प्रिंटिंग प्रेस, कराची, 1931, पृ.139-42
14. चटर्जी रामचंद्र (संपा.), दि मॉडर्न रिव्हयू, व्हॉल्यूम 81, न्यु दिल्ली, 1947, पृ. 344-346 15. ग्रोव्हर विरेंद्र, (संपा.), पुर्वोक्त., पृ. 399-400
15. ग्रोव्हर विरेंद्र, (संपा.)पूर्वोक्त-] i`- 399&400